**आयुष्यभर .....**

दाटून आलेला पाऊस
मला न सांगताच
आला नि गेला
इतका दुखावलेला |
कुठल्याश्या नखाएवढ्या
जखमेची भळभळ
अजून नाही थांबलेली
परत परत नख लावून
खोल आतून चिघळलेली |
दारावरची टकटक
कंटाळून परतली
जाताना गेल्या पावली
तिच्याही नकळत
पावसापाशी घुटमळली|
ऋतू सरला तरी
ओलेते मौन आभाळ
अजूनही ठिबकत राहते
थेम्ब थेम्ब दवाने
जरा जरा हळहळते |

**--संध्या रानडे**